**मे.कलरशाईन इंडिया प्रा.लि. (CIPL), प्लॉट क्र. डी-४, एमआयडीसी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर येथील पिकल्ड हॉट रोल्ड, कोल्ड रोल्ड फुल हार्ड कॉइल्स, गॅल्व्हनाईज्ड/अॅल्युझिंक तसेच कलर कॉइल्स व शीट्स - ६००००० टन प्रतीवर्ष उत्पादनाकरीता प्रस्तावित प्रकल्पाची दि. २८/०८/२०२६ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये मे.कलरशाईन इंडिया प्रा.लि. (CIPL), प्लॉट क्र. डी-४, एमआयडीसी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर येथील पिकल्ड हॉट रोल्ड, कोल्ड रोल्ड फुल हार्ड कॉइल्स, गॅल्व्हनाईज्ड/अॅल्युझिंक तसेच कलर कॉइल्स व शीट्स - ६००००० टन प्रतीवर्ष उत्पादनाकरीता प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्पाचे प्रस्तावित स्थळ मे.कलरशाईन इंडिया प्रा.लि. (CIPL), प्लॉट क्र. डी-४, एमआयडीसी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर येथे श्री. अनुप खांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर ह्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.०० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र-१)**.

**पार्श्वभूमी**

मे.कलरशाईन इंडिया प्रा.लि. (CIPL), प्लॉट क्र. डी-४, एमआयडीसी उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीकरीता अर्ज म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे ई-मेल द्वारे दि. १५/०६/२०२६ रोजी सादर केलेला होता. त्या अनुषंगाने मंडळाच्या मुख्यालयाने दि. १६/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये जनसुनावणीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते. **(सहपत्र-२)**.

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २२/०७/२०२६ ला दैनिक हितवाद (इंग्रजी), दैनिक लोकमत व लोकसत्ता (मराठी) या तीन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-३)**.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकुण २ निवेदने म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे **(सहपत्र-४)**. मंडळाचा आदेश दि. २६/०७/२०२६ नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-५)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार मराठी भाषेत प्रस्तावित पिकल्ड हॉट रोल्ड, कोल्ड रोल्ड फुल हार्ड कॉइल्स, गॅल्व्हनाईज्ड/अॅल्युझिंक तसेच कलर कॉइल्स व शीट्स - ६००००० टन प्रतीवर्ष उत्पादनाकरीता पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. सुबोध हाडके, शिरपुर, ता.उमरेड, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित प्रकल्पालगत जंगल, कोळसा खाणी तसेच दगड खाणी असल्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होऊन त्याचा स्थानिक पर्यावरण, आरोग्य व जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे प्रकल्पधारकाने प्रदूषण नियंत्रण प्रणाली असो किंवा वृक्ष लागवड असो या सर्व बाबींची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात यावी. | प्रकल्पधारकाने सांगितले की, प्रकल्प परिसरात उपलब्ध असलेल्या अंदाजे २ एकर क्षेत्रामध्ये योग्य प्रजातींची वृक्षलागवड करण्यात येईल. तसेच लागवड केलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन व संवर्धन करून त्यांचे संरक्षण करण्यात येईल.<br><br>प्रकल्पांमुळे कुठल्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही याची ग्वाही दिली. |
| २ | कोळसा व दगड खाणींमध्ये मोठ्या प्रमाणात उत्खनन होत असल्यामुळे परिसरातील भूजल पातळीमध्ये घट होते. त्यामुळे प्रकल्पधारकाने भूजल पातळी व जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ३. | प्रस्तावित प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याचा पुरवठा आजूबाजूच्या तलावांमधून करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तथापि, परिसरातील नैसर्गिक जलस्त्रोतांवर अतिरिक्त ताण पडू नये यासाठी वेकोलिच्या खुल्या कोळसा खाणींमध्ये साचणाऱ्या पाण्याचा योग्य प्रक्रिया करून प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार वापर करण्यात यावा. यामुळे उपलब्ध जलस्त्रोतांचे संवर्धन होण्यास मदत होईल. प्रस्तावित प्रकल्पास शुभेच्छा दिल्या. | प्रकल्पधारकाने सांगितले की, प्रस्तावित प्रकल्प हा औद्योगिक परिसरामध्ये येत असून, प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याचा पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (MIDC) करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील स्थानिक जलस्त्रोतांवर पाण्याच्या वापराचा अतिरिक्त ताण पडणार नाही, असे प्रकल्पधारकाने स्पष्ट केले. |

**२) श्रीमती. ममता हाडके, सरपंच, गट ग्रामपंचायत, शिरपूर, ता.उमरेड, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित प्रकल्पास शुभेच्छा दिल्या. तसेच प्रकल्पामध्ये स्थानिक बेरोजगार युवक-युवती तसेच महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात यावे. | प्रकल्पधारकाने सांगितले की, प्रकल्पामुळे ३०० कायमस्वरूपी व ३५० कंत्राटी रोजगाराची संधी उपलब्ध होईल. तसेच अप्रत्यक्षरित्या १२०० ते १५०० विविध प्रकारची रोजगार निर्मिती होईल. |
| २ | प्रकल्पाने स्थानिक शाळांच्या विकासकामासाठी स्थानिक पातळीवर मदत करावी. | प्रकल्पधारकाने सांगितले की, आम्ही शिक्षण, आरोग्य व पिण्याचे पाणी या बाबींवर कटीबधद आहोत. परिसरातील गावांमध्ये कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत ग्रामपंचायतीसोबत चर्चा करून सदर बाबींबाबत प्रकल्पाकडुन मदत करण्यात येईल.<br><br>या कंपनीद्वारे आन्ध्रप्रदेश राज्यात अशाप्रकारचे दोन प्रकल्प सन २०१७ पासुन कार्यान्वित आहेत. या प्रकल्पामुळे परिसरातील नागरीकांना कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. नुकतेच परिसरातील एाक शासकीय शाळेचे कंपनीमार्फत आधुनिकीकरण करण्यात आले आहे. |

..

**३) श्री. रामचंद्र वासे, माजी सरपंच, ग्रामपंचायत, धुरखेडा, ता.उमरेड, जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रकल्प एकंदरित चांगला आहे, परंतु प्रकल्पाच्या व्यवस्थापक मंडळाने सदर प्रकल्प कसा राबवावा, हे त्यांच्यावर अवलंबुन आहे.<br><br>पुर्वी प्रकल्पांना ग्रामपंचायातीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक होते. परंतु सद्यस्थितीत एमआयडीसीमध्ये येणाऱ्या प्रकल्पांना ग्रामपंचायातीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.<br><br>एमआयडीसी परिसरातील सद्यस्थितीत सुरू असलेल्या उद्योगांमधून विशेषतः टायर पायरोलिसीस | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | उद्योगांमधून रात्रीच्या वेळी होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे स्थानिक नागरिकांना त्रास होतो. याबाबत एमआडीसीकडे तक्रार दिली होती. परंतु कारवाई झाली नाही. प्रशासनाने याची दखल घ्यावी.<br><br>एमआयडीसी मध्ये ग्रामपंचायतीमार्फत रस्त्यालगत वृक्ष लागवड करण्यात आली होती. | |
| २ | परिसरातील प्रकल्पस्थळापासून ८ कि.मी. अंतराच्या आतील गावांमधील स्थानिक युवक-युवती तसेच सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगारास प्राधान्य देण्यात यावे. काही उद्योगामध्ये स्थानिक बेरोजगारांना डावलुन परराज्यातील लोकांना रोजगार देतात. | प्रकल्पधारकाने सांगितले की, प्रकल्पामुळे ३०० कायमस्वरूपी व ३५० कंत्राटी रोजगाराची संधी उपलब्ध होईल. तसेच अप्रत्यक्षरित्या १२०० ते १५०० विविध प्रकारची रोजगार निर्मिती होईल. |
| ३ | प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरातील पर्यावरणास कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही याची प्रकल्पधारकाने योग्य ती दक्षता घ्यावी. प्रदूषणामुळे नुकसान झाल्यास सदर उद्योगास ग्रामपंचायतच्या वतीने सिल लावण्यात येईल. | प्रस्तावित प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (ETP), घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP) तसेच शून्य द्रव निचरा प्रणाली (Zero Liquid Discharge – ZLD) उभारण्यात येईल. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा प्रकल्पामध्ये आवश्यकतेनुसार पुनर्वापर व पुनर्चक्रण करण्यात येईल. पिकलिंग प्रक्रियेतुन निर्माण होणाऱ्या ॲसीडची प्रक्रिया ॲसीड रिकव्हरी प्लान्टमध्ये करण्यात येईल. तसेच प्रक्रिया न केलेले सांडपाणी कोणत्याही परिस्थितीत परिसरातील नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये सोडले जाणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. |
| ४ | प्रस्तावित प्रकल्पाचा मंजूर नकाशा व संबंधित मान्यताप्राप्त आराखडा स्थानिक ग्रामपंचायतीकडे सादर करण्यात यावा. | |

**४) श्रीमती. सरिता वासे, सरपंच, ग्रामपंचायत, धुरखेडा, ता.उमरेड, जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | एमआयडीसी परिसरातील सद्यस्थितीत सुरू असलेल्या उद्योगांमधून होणाऱ्या प्रदूषणाचा स्थानिक नागरिकांना त्रास होतो. याबाबत संबंधित विभागाकडे तक्रार अर्ज करूनही अद्याप अपेक्षित दखल घेण्यात आली नाही. एमआडीसीतील उद्योगांनी प्रदषणामुळे गावकऱ्यांना त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| २ | विद्यमान उद्योगांकडुन परिसरात व तलावांच्या आसपास कचरा टाकण्यात येत असल्यामुळे पर्यावरण व आरोग्यावर घातक परिणामा होत असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. | |
| ३ | प्रकल्प धारकास आग्रहाची विनंती केली, की त्यांनी प्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी व मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

### ५) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रकल्पास समर्थन दर्शविला.<br>एमआयडीसी क्षेत्रात कचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापन एमआयडीसी अंतर्गत झाल्यास जनसुनावणीची गरज भासणार नाही व प्रकल्प कमी वेळात उभारणे शक्य होईल.<br><br>या प्रकल्पामध्ये ६५० लोकांना रोजगार मिळेल याबाबत प्रकल्पाचे अभिनंदन केले. वेगवेगळ्या पर्यावरणवादी संस्था प्रकल्पांना विरोध करीत असतात, परंतु प्रदूषणाचे विविध स्त्रोत आहेत. त्यामध्ये रासायनिक खतामुळे होणारे प्रदूषण, किटकनाशक फवारणीमुळे होणारे प्रदूषण व वाहनांमुळे होणारे प्रदूषण, कोळशामुळे होणारे प्रदूषण इत्यादींचा समावेश आहे. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

### ६) श्री. एस. चंद्रशेखर, पर्यावरण तज्ञ.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरामध्ये हरित व पर्यावरणपूरक विकासास प्राधान्य देण्यात यावे. प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांना प्रत्यक्ष सुमारे ६५० रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.<br><br>तसेच परिसरातील गावांच्या विकासासाठी, स्थानिक शाळांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच आरोग्यविषयक सुविधांसाठी प्रकल्पधारकाने कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत आवश्यक त्या विकासकामांना प्राधान्य दयावे. | प्रकल्पधारकाने सांगितले की, आम्ही शिक्षण, आरोग्य व पिण्याचे पाणी या बाबींवर कटीबध्द आहोत. परिसरातील गावांमध्ये कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत ग्रामपंचायतीसोबत चर्चा करून सदर बाबींबाबत प्रकल्पाकडुन मदत करण्यात येईल. |

श्रीमती.हेमा देशपांडे, सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, यांनी प्रकल्प प्रवर्तकाला सुचना दिल्या की, संपुर्ण प्रदूषण नियंत्रण प्रणाली उभारल्यानंतरच प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावा व परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी.

श्री. अनुप खांडे अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर, यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना दिल्या की, जनसुनावणीमध्ये सादर केलेल्या सर्व बाबी जसे की, स्थानिकांना रोजगार, हरितपट्ट्याचा विकास इत्यादी आश्वासनांचे तंतोतंत पालन करावे. प्रकल्पाच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत करण्यात येणाऱ्या विकासकामांसाठी स्थानिक ग्रामपंचायतीसोबत समन्वय साधून निधीचा योग्य विनियोग करण्यात यावा तसेच स्थानिक नागरिकांशी सातत्यपूर्ण जनसंपर्क ठेवण्यात यावा. प्रकल्पाच्या कार्यान्वयनामध्ये मानवी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्ययावत करण्यात यावा व आपातकालीन प्रणाली सदैव सज्ज ठेवण्यात यावी. तसेच प्रकल्प परिसरात आवश्यकतेनुसार रुग्णवाहिकेची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावी.

प्रकल्पातून होणारे वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण विहित मर्यादेत राहील, याची दक्षता घेण्यात यावी. प्रकल्पाच्या कार्यामुळे भूजल पातळीवर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच प्रकल्प प्रवर्तकाने पावसाच्या पाण्याचे संधारण व पुनर्भरणासाठी आवश्यक जलसंधारण व्यवस्था उभारावी. प्रकल्पाची संपूर्ण यंत्रणा व प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना पूर्णपणे कार्यान्वित केल्याशिवाय उत्पादन सुरू करण्यात येऊ नये.

त्यानंतर उपस्थित जनसमुदायास प्रकल्पाबाबत काही आक्षेप, सूचना, हरकती अथवा टीका-टिप्पणी असल्यास त्या मांडण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच कोणाकडे लेखी स्वरूपातील आक्षेप अथवा सूचना असल्यास त्या पुढील दोन दिवसांच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले. उपस्थित नागरिकांनी मांडलेले सर्व मुद्दे, आक्षेप व सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तकाने दिलेली उत्तरे यांची यथोचित नोंद घेऊन सदर कार्यवाही अहवाल शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल.

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने सदर पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(सुशिलकुमार राठोड)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२

(अनुप खांडे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर